

स्थापना दि. २४/०३/१९५३

ग्रामपंचायत हा लोकशाहीचा पाया आहे.



# ग्रामपंचायत निमगांव म्हाळुंगी

ता.शिरूर ,जि.पुणे ४१२२०९

| सौ.अश्विनी एकनाथ लाडगे | श्री.गुलाब भाऊसाहेब नवले | श्री.बापूसाहेब बबनराव काळे |
|---|---|---|
| (उपसरपंच) | (ग्रामविकास अधिकारी) | (सरपंच) |

जा.क्र. 38\2028

दि. २४/०१/२०२४

मा.सरपंच ग्रामपंचायत निमगाव म्हाळुंगी तालुका शिरूर जिल्हा पुणे यांजकडून दाखला देण्यात येतो की,सेंट मीरा ता.मिलींचे महाविद्यालय पुणे यांच्या राष्ट्रीय सेवा योजना तर्फे निमगाव म्हाळुंगी ता.शिरूर जि.पुणे येथे विशेष श्रमसंस्कार शिबिर दिनांक १८ जानेवारी २०२४ ते २४ जानेवारी २०२४ या कालावधीत आयोजित करण्यात आले. होते. या निवासी शिबीर काळात व्याख्याने,प्रभात फेरी मतदाना बद्दलची जागरूकता, अवयवदान, जल संवर्धन, महिला सक्षमीकरण,रस्ता सुरक्षा यांसारख्या विषयावर जनजागृती करण्यात आली. तसेच लोकसंख्या नियंत्रण, हुंडाबंदी,स्वच्छता हीच सेवा,बालविवाह थांबवा,लिंगभेद मुक्ती या विषयांवर वरील पथनाट्य सादर करून जनजागृती करण्यात आली या शिबिराच्या काळात निमगाव म्हाळुंगी गावासाठी खालील उपक्रम राबविण्यात आले.

१)प्राथमिक शाळेची इमारत स्वच्छ करणे.

२) प्राथमिक शाळेत मधील वृक्षांना रंग काऊ व चुना लावणे

३)प्राथमिक शाळेत मधील वृक्षांना आळे करून सुशोभीकरण करणे.

४) गावातील निमगाव म्हाळुंगी गावाचे प्राथमिक (सामाजिक आर्थिक) सर्वेक्षण करणे.

५) गावातील मंदिराची स्वच्छता - म्हसोबा मंदिर, मारुती मंदिर,महादेव मंदिराचे स्वच्छता केली.

६)व्याख्याने - वित्तीय साक्षरता, पर्यावरण संरक्षण गतीविधी, शासकीय योजना - बेटी बचाव बेटी पढाओ,लेक लाडकी,बालिका समृद्धी,उडान इ. योजनांची माहिती देण्यात आली. २१ व्या शतकात सकारात्मक विचार – श्रद्धा-विश्वास, युवकांसमोरील आव्हाने,आधुनिक शेती,व्यक्तिमत्व घडविण्यात शिक्षणाचा हात,श्री शिवछत्रपती शिवाजी महाराजांचे नेतृत्व गुण, योगा आणि निरोगी जीवन इ. व्याख्याने घेण्यात आली.

७)प्राथमिक शाळेला गोष्टीची व अन्य पुस्तके भेट देण्यात आली.

८) ५४ झाडाचे वृक्षारोपण करण्यात आले.

९) गावातील स्मशानभूमी स्वच्छ करण्यात आली.

१०)श्री.राम मूर्ती प्राणप्रतिष्ठा उत्सवाच्या निमित्ताने मंदिरासमोर विद्यार्थीनिंनी रांगोळ्या काढण्यात आल्या.

११)म्हसोबा मंदिर ते निमगाव फाटा यामध्ये असणाऱ्या झाडांना चुना काऊ रंगाचे पट्टे देण्यात आले.

१२) विद्यार्थीनिंनी सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे जनजागृती केली. त्यामध्ये देशभक्तीपर गीते,गणेश वंदना,नृत्य गायन इ.कार्यक्रम करण्यात आले.

आमच्या मते वरील कामांचे मूल्यमापन ३ लाख रुपये असे होईल. सेंट मीरा मुलींच्या महाविद्यालयातील रासयो स्वयंसेवकाचे या शिबिरातील यशासाठी अभिनंदन व त्यांच्या भविष्यातील कार्यासाठी शुभेच्छा.

24/1/24

सरपंच

ग्रामपंचायत निमगाव म्हाळुंगी

ता. शिरूर जि. पुणे



स्थापना दि. २४/०३/१९५३

ग्रामपंचायत हा लोकशाहीचा पाया आहे.

# ग्रामपंचायत निमगांव म्हाळुंगी

ता.शिरूर ,जि.पुणे ४१२२०९



| सौ.अश्विनी एकनाथ लाडगे (उपसरपंच) | श्री.गुलाब भाऊसाहेब नवले (ग्रामविकास अधिकारी) | श्री.बापूसाहेब बबनराव काळे (सरपंच) |
|---|---|---|

जा.क्र. दि.१६/०१/२०२४

प्रति,

प्रो.डॉ.जया राजगोपालन.

प्राचार्य.

सेंट मिराज मुलींचे महाविद्यालय

पुणे ४११००१

विषय - निमगाव म्हाळुंगी गावात विशेष हिवाळी शिबिर आयोजित करण्यासाठी परवानगी देणेबाबत.

संदर्भ - आपले सेंट मिराज मुलींचे महाविद्यालयाचे दिनांक १६/०१/२०२४ चे पत्र.

मा. महोदय

उपरोक्त विषयानुसार आपणास कळविण्यात येते की सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत सेंट मिराज मुलींचे महाविद्यालय मध्ये राष्ट्रीय सेवा योजना सेवा योजना (N.S.S) चा विभाग कार्यान्वित आहे. तरी सन २०२३/२४ या शैक्षणिक वर्षांमध्ये आपण आमच्या गावामध्ये ७ दिवसीय विशेष हिवाळी शिबिर दिनांक १८/०१/२०२४ ते २४/०१/२०२४ आयोजित करावे. व त्यास ग्रामपंचायतीची परवानगी आहे. गावामध्ये मुलांना राहण्याची सोय, पाण्याची सोय तसेच शौचालय बाथरूमची सोय उपलब्ध आहे. तसेच जेवण बनविण्यासाठी जागा उपलब्च आहे.

कळावे

आपला विश्वासू

सरपंच

ग्रामपंचायत निमगाव म्हाळुंगी

ता. शिरूर जि. पुणे